**<u>दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कागल यांचे न्यायालयात</u>**
**<u>(पिठासिन अधिकारी : श्री. अ.भि.मडके)</u>**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४६/२०२५**
CNR NO. MHKO130022392025

१. **सखुबाई तुकाराम शेटके,** )
वय : ७४ वर्षे, व्यवसाय : घरकाम, )
रा. शेंडूर, ता. कागल, जि. कोल्हापूर. )

२. **सौ. वंदना वकिल पाटील,** )
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : घरकाम, )
रा. खेबवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर )

३. **सौ. संगिता रंगराव पाटील,** )
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : घरकाम, )
रा. देवठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ) **..अर्जदार**

**विरुध्द**

१. **श्रीमती कल्पना तुकाराम शेटके,** )
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : घरकाम, )
रा. शेंडूर, ता. कागल, जि. कोल्हापूर. )

)

२. **सौ. सुनिता दिनकर पाटील,** )
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : घरकाम, )
रा. बेलवळे खुर्द, ता. कागल, जि. कोल्हापूर)

३. **सौ. अनिता चंद्रकांत मोहिते,** )
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : घरकाम, )
रा. चिंचवाड, ता. करवीर, जि. कोल्हापूर )

४. **श्री. पांडुरंग तुकाराम शेटके,** )

वय : ३४ वर्षे, व्यवसाय : शेती, )
रा. शेंडूर, ता. कागल, जि. कोल्हापूर. ) **..वि.प.**

**:: <u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u> ::**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ नुसार वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथनानुसार अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील तुकाराम गणपती शेटके हे शेंडूर, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे दि. ११/१२/२००८ इ. रोजी मयत झाले आहेत. मयत तुकाराम गणपती शेटके यांना यातील अर्जदार व वि.प. हेच सरळ व कायदेशीर वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत. कै. तुकाराम गणपती शेटके यांचे नावे शेंडूर, ता. कागल येथे गट नं. १८०४ व १४४० या शेत जमिन मिळकती आहेत. तसेच सि.स. नं. २२३ मध्ये घर जागा मिळकती आहेत.

३. अर्जदार यांचे कथनानुसार, अर्जदार यांना सरकारी, निमसरकारी व महसूल सदरी वडीलार्जित मिळकतींना वारस नोंदी करणेसाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. नि. १ वरील आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणातील वि.प. यांना नोटीस काढली असता वि.प. नं. १ ते ३ यांनी सदर प्रकरणी हजर होउन नि. ८ वर तसेच वि.प.नं. ४ यांनी नि. १३ वर प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वि. प. नं. १ ते ४ यांनी त्यांच्या म्हणणे दाखल करून अर्जदार यांच्या प्रस्तुतच्या अर्जातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे व अर्जात नमूद केलेली वंशावळ खरी व बरोबर असल्याचे व ती त्यांना मान्य व कबूल असल्याचे कथन केले आहे. तसेच अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेस त्यांची तक्रार अथवा हरकत नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे कै. तुकाराम गणपती शेटके यांना अर्जदार व वि.प. हेच जवळचे, सरळ व कायदेशीर वारस असल्याने

अर्ज मंजूर करण्यात यावा असे कथन केले आहे. तसेच नि. २४ वरील पुरसीस नुसार त्यांनी सदर कामी पुरावा देणेचा नसलेबाबत पुरसीस दाखल केलेली आहे.

५. अर्जदार क्र. ३ सौ. संगिता रंगराव पाटील यांनी स्वत:करिता तसेच इतर अर्जदारांकरिता प्रतिज्ञापत्र नि.क्र. १५ वर सादर केले आहे. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिज्ञापत्रात कथने केलेली आहेत. तसेच कागदोपत्री पुरावा म्हणून नि. १७ वर गावकामगार पोलीस पाटील, शेंडूर यांचे पत्र, नि.क्र. १८ वर कै. तुकाराम गणपती शेटके यांच्या मृत्यू दाखल्याची मूळ प्रत, नि. १९ व २० वर अनुक्रमे अर्जदार नं. २ व ३ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणीत प्रती तसेच नि. २१ अर्जदार क्र. १ यांच्या मतदार ओळखपत्राची प्रमाणित प्रत आहे. नि. २२ वर अर्जदार नं. १ यांनी रु. १००/- चे स्टॅम्पवरती वारसा प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच शेंडूर येथील सि.स.नं. २२३ चे प्रॉपर्टीकार्डची ऑनलाईन डीजीटल सही असलेली प्रत दाखल केलेली आहे व दि. ०१/०२/२०२६ इ. रोजीच्या 'दै. पुण्यनगरी' या वृत्तपत्रातील जाहीरनामा नि.क्र. १४ वर दाखल केलेले आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांनी पुरावा बंद पुरशिस नि.क्र. २३ वर दाखल केलेली आहे.

६. वरील सर्व कथनांचा विचार करता व दाखल कागदपत्रांची पहाणी केली असता अर्जदार क्र. १ ते ३ व वि.प.क्र. २ ते ४ हे मयत कै. तुकाराम गणपती शेटके यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. परंतु वि.प.क्र. १ हे मयत तुकाराम गणपती शेटके यांची कायदेशीर पत्नी नसलेमुळे ती मयत तुकाराम गणपती शेटके यांची कायदेशीर वारस होवू शकत नाही. तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करून अर्जातील कथनांस वि.प.क्र. १ ते ४ यांनी म्हणणे देवून अर्जदार व वि. प. यांचे नांवे वारसा दाखला देण्याबाबत हरकत नसल्याचे सांगितले. त्यामुळे अर्जातील कथने ही निर्विवाद राहिलेली आहेत.

७. उपरोक्त परिस्थितीनुसार व दाखल कागदपत्रानुसार अर्जदार क्र. १ ते ३ व वि.प.क्र. २ ते ४ हे मयत कै. तुकाराम गणपती शेटके यांचे कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे परिणामत: ते वारसा प्रमाणपत्र

मिळणेकरीता पात्र ठरले आहेत. या परिस्थितीत निम्नलिखीत आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ३ व वि.प.क्र. २ ते ४ हे मयत कै. तुकाराम गणपती शेटके यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ८ अन्वये वारस दाखला अर्जदार यांना (heirship certificate) योग्य त्या कोर्ट फी वर देण्यात यावा.

३. अर्जदार व वि.प. यांना त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे व सिव्हील मॅन्युअल प्रकरण १४ मधील परिच्छेद क्र. ३१२ प्रमाणे मुळ वारसा प्रमाणपत्रावर टीप नमुद करावी.

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.05.05 17:10:25 +0530

कागल. **(अ.भि.मडके)**

दिनांक : ०५/०५/२०२६ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, कागल.